दै. पुढारी दि. १४/५/२०१८

# आयोगाच्या सूचनेनुसार संस्थांनी काम करावे : डॉ. सावंत

वार्ताहर

कारच्या नीती आयोगाने मार्गदर्शक सूचनांनुसार कास मंत्रालयाला लागते. जर त्याची योग्य दिशेने झाली तर चांगले होते. त्यासाठी वे योग्य दिशेने पालन ल्याला अपेक्षित यश , असे प्रतिपादन सिंधुदुर्ग स्थानचे अध्यक्ष डॉ. यांनी केले.

विकास मंत्रालय भारत त जनशिक्षण संस्थान, शिक्षकांची बैठक येथील हाराज महाविद्यालयात रण्यात आली होती. लत होते. व्यासपीठावर वस्थापकीय कमिटीचे पार्सेकर, शिवप्रसाद केनवडेकर, संचालक उपस्थित होते. यावेळी णाले, प्रत्येक संस्थेची स्वतःची अशी ध्येय धोरणे असतात. त्यानुसार कोणत्या गोष्टीवर अधिक भर दिला पाहिजे हे प्रत्येक संस्थेने ठरवायचे असते. आपल्या संस्थेने येथील लोकांच्या रिकामी हातांना काम मिळून ते स्वावलंबी कसे बनविल याचा प्रामुख्याने विचार केला, असे मत त्यांनी व्यक्त केले. सदस्य शिवप्रसाद देसाई म्हणाले, संस्थेची ध्येयधोरणे खऱ्या अर्थाने राबविण्याचे काम प्रशिक्षक करत असतात. आपण देत असलेल्या प्रशिक्षणामध्ये वेळोवेळी कोणते बदल अपेक्षित आहेत हे निदर्शनास आणले पाहिजेत. रोजगार निर्मितीमध्ये प्रशिक्षकाची भूमिका फार मोलाची असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. गेल्या १६-१७ वर्षामध्ये संस्थेचे स्वरूप निश्चितच पालटले आहे. नवनवीन प्रयोग करताना त्यांच्या निकषांवर यशस्वी होणे फार महत्त्वाचे असते. भविष्यातील आपल्या योजना काय आहेत आणि त्या पूर्ण करण्यासाठी आपला दृष्टीकोन




**कुडाळ : जनशिक्षण संस्थान प्रशिक्षकांच्या बैठकीत बोलताना नकुल पार्सेकर. सोबत श्री. परब, विजय केनवडेकर, डॉ. एस.टी. सावंत आदी.**

कसा आहे यावर संस्थेचे यश अवलंबून असते. त्यासाठी आपण प्रशिक्षकांनी या गोष्टीसाठी कटिबध्द व्हा, असे आवाहन त्यांनी केले.

केनवडेकर म्हणाले, प्रशिक्षण हे केवळ प्रशिक्षण न राहता ते रोजगार निर्मितीचे साधन बनले पाहिजे. यामध्ये काळानुरूप कोणते बदल अपेक्षित आहेत, या सूचना आपणा प्रशिक्षकांमधून आल्या पाहिजेत. प्रास्ताविक संचालक डी.आर. परब यांनी केले. जिल्ह्यातील प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित प्रशिक्षकांनी आपले अनुभव व मनोगत व्यक्त केले.